# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 June 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- राज्यात खरीप हंगामाचं नियोजन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला निर्देश
- उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्षातून दोन वेळा प्रवेश प्रक्रिया राबवण्यास यूजीसीची परवानगी
- ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल शर्मा यांना पद्म भूषण पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान
- आषाढी यात्रेसाठी एसटीकडून पाच हजार विशेष बस सोडण्याचं नियोजन

आणि

- मराठवाड्यात अतिवृष्टी–लातूर जिल्ह्यात नदीकाठालगत धोक्याचा इशारा

****

राज्यात यंदा चांगल्या पावसाची शक्यता लक्षात घेत, शेतकऱ्यांना बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही, याची दक्षता घेऊन, खरीप हंगामाचं नियोजन करण्याचे निर्देश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मुंबईत काल खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. बियाण्यांचा काळाबाजार आणि बनावट बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभागानं धडक कारवाई करावी, पाणीटंचाई असलेल्या भागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, चारा छावण्या उभारण्याला जिल्हा प्रशासनानं प्राधान्य द्यावं, तसंच आपत्तीकाळात सर्व विभागांनी समन्वयातून काम करावं, आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.

दरम्यान, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या काल मुंबईत झालेल्या बैठकीला मुख्यमंत्र्यांनी संबोधित केलं. कांदा निर्यात, सोयाबीन तसंच कपाशीच्या किमान हमी भावाकडे लक्ष देण्याची, तसंच तेलाची आयात कमी करून देशांतर्गत तेलाचं उत्पादन वाढवण्याची आवश्यकताही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

****

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन दुष्काळ तसंच राज्यातल्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत, राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी राज्यपालांकडे केल्याचं पटोले यांनी सांगितलं.

****

बनावट कागदपत्रांच्या आधारे मुंबईत लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करणाऱ्या चार बांग्लादेशी नागरिकांना दहशतवाद विरोधी पथक -एटीएसनं अटक केली. या चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना बनावट कागदपत्रं मिळवून देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरता होणाऱ्या या निवडणुकीसाठी, ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. येत्या २६ जून रोजी मतदान होणार असून, एक जुलैला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, या निवडणुकीत मतदानाची वेळ वाढवण्याबाबतची काही संघटनांची मागणी मान्य करत, निवडणूक आयोगानं ही वेळ आता सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत केली आहे.

****

विद्यापीठ अनुदान आयोग- यूजीसीने उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोन वेळा प्रवेश प्रक्रिया राबवण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय अंमलात येणार आहे. सध्या एका वर्षात एकाच शैक्षणिक सत्रात प्रवेश घेता येतो. परीक्षांचा निकाल उशीरा लागलेल्या तसंच वैयक्तिक कारणांमुळे पहिल्या सत्रात प्रवेश न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांना या नव्या निर्णयामुळे, लाभ होणार आहे.

****

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेली नीट ही परीक्षा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल

झाली आहे. न्यायालयाच्या सुटीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या आठ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या समुपदेशन प्रक्रियेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला.

****

ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल रामप्रसाद शर्मा यांना पद्म भूषण पुरस्कार काल प्रदान करण्यात आला. मुंबईत वांद्रे इथल्या त्यांच्या निवासस्थानी राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितिन करीर तसंच अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी प्यारेलाल यांना हा पुरस्कार प्रदान करत, शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन सत्कार करून त्यांचं अभिनंदन केलं.

****

आषाढी यात्रेसाठी श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात पाच हजार विशेष बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. राज्यातल्या कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असं आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्याच्या अनेक महसूल मंडळात सोमवारी अतिवृष्टीची नोंद झाली.

लातूर जिल्ह्यातल्या दहापैकी सहा तालुक्यात अतिवृष्टी झाली. यात लातूर, औसा, निलंगा, चाकूर, रेणापूर आणि शिरूर अनंतपाळ या तालुक्यांचा समावेश आहे. एकाच दिवसात जिल्ह्यात ६३ पूर्णांक सात मिलीमीटर पाऊस झाला. घरणी नदीवरील पर्यायी पूल वाहून गेल्यानं, शिरुर अनंतपाळ ते उदगीर हा राज्यमार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. या नदीवरच्या पुलाचं काम सुरू असल्यानं, हा पर्यायी पूल उभारण्यात आला होता. या ठिकाणी वाहतुकीसाठी दुसरा मजबूत पर्यायी पूल तयार करून देण्याची मागणी होत आहे. प्रशासनाने घरणी नदीकाठच्या ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात रेणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन, रेणापूर, जवळगा आणि खरोळा बंधारे पूर्ण भरले आहेत. त्यामुळे रेणा नदी काठावरच्या गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रेणा नदी काठावरच्या गावातल्या

शेतकरी आणि नदीकाठी वस्ती करून राहिलेल्या नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

**

धाराशिव जिल्ह्यातही आठ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. या पावसामुळे जिल्ह्यातल्या तेरणा नदीसह इतर नद्या वाहत्या झाल्या असून, यामुळे जिल्ह्यावरचं पिण्याच्या पाण्याचं संकट काही प्रमाणात कमी होणार आहे. या पावसामुळे खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**

बीड जिल्ह्यात चार महसुली मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. यात घाटनांदूर मंडळामध्ये ६६ मिलीमीटर, अंबाजोगाई मंडळात ७१, परळी वैद्यनाथ तालुक्यात धर्मापुरी मंडळात ८१ मिलीमीटर, तर धारूर तालुक्याच्या मोहखेड मंडळात सर्वाधिक ९१ मिलीमीटर पाऊस झाला.

दरम्यान, नैऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण मराठवाड्यात सक्रिय झाला आहे. आज आणि उद्या मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६४ वा दीक्षांत समारंभ उद्या गुरुवारी होणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉक्टर प्रशांत अमृतकर यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सकाळी अकरा वाजता समारंभाला सुरूवात होईल, विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळांवरुन या समारंभाचं थेट प्रसारण करण्यात येणार आहे.

****

राज्य वस्तू आणि सेवा कर विभागानं केलेल्या जिल्ह्यांच्या विभागीय पुनर्रचनेमुळे धाराशिव जिल्ह्यातल्या व्यापारी आणि उद्योजकांची गैरसोय होणार असून, हा जिल्हा परत सोलापूर विभागीय कार्यालयाला जोडावा, अशी मागणी केली जात आहे. जिल्हा व्यापारी आणि कर सल्लागार संघटनेच्यावतीनं काल संबंधित कार्यालयात या मागणीचं निवेदन देण्यात आलं.

****

दक्षिण कोरिया आणि मुंबईच्या काही निर्यातदारांनी काल जालना जिल्ह्यात बदनापूर मोसंबी केंद्रास भेट देऊन पाहणी केली. केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ज्ञ डॉ. संजय पाटील यांनी या फळासंबंधी सर्व माहिती दिली. जालना जिल्ह्यात मोसंबीला भौगोलिक मानांकन मिळालं आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अमेरिकेसोबत होणार आहे. न्यूयॉर्क इथं होणारा हा सामना भरतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. गुणतालिकेत अ गटात भारत पहिल्या तर अमेरिका दुसऱ्या स्थानावर आहे. सध्या नामिबिया आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान सामना सुरु आहे. काल या स्पर्धेत पाकिस्ताननं कॅनडाचा सात गडी राखून पराभव केला.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात आकाशवाणी चौकात गॅस सिलिंडरची वाहतुक करणाऱ्या ट्रकने धडक दिल्यानं रस्ता ओलांडणाऱ्या एका महिलेचा मृत्यू झाला. काल रात्री ही दुर्घटना घडली. या घटनेत संबंधित महिलेचे पती गंभीर जखमी झाले आहेत. सदर ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

****

जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी काल बियाणं, खतं तसंच औषधी विक्रेत्यांच्या दुकानाना भेट देऊन तपासणी केली. सिंधी काळेगाव इथले शेतकरी विष्णुपंत गिराप यांच्या शेतात भेट देऊन पांचाळ यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला, शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारे त्रास होणार नाही यांची कृषी विभागाने दक्षता घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली.

****

परभणी जिल्ह्यातल्या, अल्पसंख्यांक समाजातल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी गंगाखेड आणि सेलू इथल्या वसतीगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. चालू शैक्षणिक वर्षासाठी गंगाखेड इथं येत्या २४ तारखेपर्यंत तर सेलू इथं प्रवेशासाठी येत्या १५ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

****

विवाहित जोडप्यापैकी एक जण दिव्यांग असलेल्या पंधरा जोडप्यांना हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून प्रोत्साहनपर अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचं वाटप करण्यात आलं. दिव्यांग

व्यक्तीसोबत विवाह करण्यासाठी सुदृढ व्यक्तींनी पुढे यावं आणि त्यांना सामाजिक समानता मिळावी, हा या योजनेचा हेतू आहे.

****

दक्षिण मध्य रेल्वेनं नांदेड- हडपसर-नांदेड विशेष गाडीच्या तीन फेऱ्या रद्द केल्या आहेत. यात नांदेड - हडपसर विशेष गाडी आज तसंच येत्या १९ आणि २६ या तारखांना, तर, हडपसर ते नांदेड विशेष गाडी उद्या तसंच येत्या २० आणि २७ या तारखांना रद्द करण्यात आली आहे.

****